स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

राष्ट्रीय सेवा योजना NATIONAL SERVICE SCHEME

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच्.डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

**संदर्भ : रासेयो/२०२५–२६/३९०** **दि. २९/११/२०२५**

**प्रति,**
**मा. प्राचार्य व रासेयो कार्यक्रम अधिकारी**
**रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
**पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा**

**विषय : विशेष शिबिर नियोजन बैठकीबाबत व Online प्रस्ताव भरणेबाबत**

महोदय/महोदया,

दरवर्षी राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत प्रत्येक रासेयो महाविद्याल दत्तक गाव योजना राबवते आणि ह्याअंतर्गत या गावात ७ दिवसीय विशेष शिबिर घेतले जाते. शैक्षणिक वर्ष २०२५–२६ वर्षाकरिता मा. राज्यसंपर्क अधिकारी कार्यालय यांनी पाठवलेल्या पत्रानुसार **'Youth for Sustainable Development with Special Focus on Watershed Management and Wasteland Development' या विषयावर आधारीत** विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात यावे. महाविद्यालयांनी **My Bharat** पोर्टलवर रजीस्ट्रेशन करून **My Bharat** पोर्टलवर **Activity Event** तयार करून **Upload** करावेत. बॅनर, टीशर्ट, कार्यक्रम पत्रिकेवर सदर थीमचा उल्लेख करावा. विशेषतः महाविद्यालय आयोजित विशेष शिबिरांस, राष्ट्र/राज्य व विद्यापीठस्तरावरील वरिष्ठ अधिकारी, जिल्हा/विभाग समन्वयक अनपेक्षितपणे भेट देणार आहेत. सबब ग्रामीण शिबिरांचे नियोजन सकारात्मक व परिणामकारक करावे.

त्या अनुषंगाने महाविद्यालयाने एक गाव दत्तक घेवून दत्तक गावाच्या विकासकामांबाबत आढावा घेऊन विद्यापीठाने ठरवून दिलेले उपक्रम आयोजित करावयाचे आहेत. महाविद्यालयांमधील राष्ट्रीय सेवा योजना एककांनी या वर्षीचा विषयनिहाय विद्यार्थी सहभाग, विशेष शिबिराचे आयोजन अत्यंत नेटके, सर्वव्यापी आणि अधिक परिणामकारक करणे अधिक महत्त्वाचे मानले आहे, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

यावर्षी प्रत्येक रासेयो एककाने हे ७ दिवशीय विशेष शिबिर **३१ जानेवारी २०२६** पर्यंत आयोजित करणे आवश्यक आहे. विशेष शिबिरासाठीचे प्रत्येक रासेयो एककाकडून प्रस्ताव मागवण्यात येत आहेत. हे प्रस्ताव Online पद्धतीने मागवण्यात येत असून **दि. १५ डिसेंबर, २०२५** पर्यंत राष्ट्रीय सेवा योजना एककांनी Online प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. ह्यासाठी www.unipune.ac.in/bcud/login/nss/special_camp_proposal लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. **दि. १५ डिसेंबर २०२५** नंतर शिबिर प्रस्ताव Online लिंक उपलब्ध करून देण्यात येणार नाही. तरी निर्धारीत कालावधीमध्ये प्रस्ताव भरण्यात यावे.

 *मागे पहा...*

त्या पार्श्वभूमीवर **विशेष शिबिर नियोजन** बैठकीचे आयोजन पुढीलप्रमाणे जिल्हानिहाय पद्धतीने करण्यात आले आहे. नियोजन बैठकीसमयी आपल्या महाविद्यालयातील एक रासेयो कार्यक्रम अधिकारी निवड केलेल्या गावाची माहिती सोबत घेऊन उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यांमधील रासेयो जिल्हा व विभाग समन्वयक यांनी अनिवार्यपणे उपस्थित राहणे आवश्यक आहे.

| क्र | सभेचे ठिकाण | विभाग | दिनांक | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज सभागृह, इरावती कर्वे संकुल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ | पुणे जिल्हा (शहर व ग्रामीण) | ३ डिसेंबर, २०२५<br>स. १०.०० वाजता : नावनोंदणी<br>स. ११.०० वाजता : नियोजन बैठक | रासेयो कार्यालय विद्यापीठ<br>०२०-५६२२६८८,८९,९०,९१ |
| ३ | शिक्षण प्रसारक संस्थेचे संगमनेर न.पा. आर्ट्स, डी.जे. मालपाणी कॉमर्स अँड बी. एन. सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर | अहिल्यानगर व नाशिक जिल्हा | १० डिसेंबर, २०२५<br>स. १०.०० वाजता : नावनोंदणी<br>स. ११.०० वाजता : नियोजन बैठक | डॉ. वसंत खरात<br>९८५००६०६४५ |

सदर नियोजन बैठकीमध्ये उपस्थित राहणाऱ्या व उपरोक्त कालावधीमध्ये Online प्रस्ताव सादर करण्याऱ्या महाविद्यालयांनाच विशेष शिबिराचा प्रथम हप्ता देण्यात येणार आहे. महाविद्यालयांमार्फत शिबिर प्रस्ताव प्राप्त होणे गरजेचे असून त्याशिवाय महाविद्यालयांनी विशेष शिबिराचे आयोजन करू नये, तसेच महाविद्यालयांना शिबिराचा प्रथम हप्ता देता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

दत्तक गावाची निवड करताना शिबिरार्थी एकत्र किंवा टप्प्याटप्प्यात काम करतील आणि निवासस्थानी राहतील अशी व्यवस्था गावातील पदाधिकाऱ्यांशी बोलून त्याची शहानिशा करावी. केवळ राहण्या-खाण्याची सोय हाच एखाद्या गावाच्या निवडीचा निकष अजिबात असू नये असेही पुन्हा अधोरेखित करण्यात येत आहे. त्याऐवजी पुढील तीन ते पाच वर्षांमध्ये त्या गावात विविधांगी विकास व संरचनात्मक काम करणे शक्य व्हावे आणि अशा उपलब्धी व नैसर्गिक गरजा ज्या गावामध्ये निदर्शनास येतील त्याच गावाची संयोजक महाविद्यालयांनी निवड करावी. कळावे, ही विनंती.



**संचालक (अतिरिक्त कार्यभार)**
**राष्ट्रीय सेवा योजना**

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.**

एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.

ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र.०२२-२२६७९५६५

---

**क्रमांक:रासेयो-२०२५/प्र.क्र.१११/रासेयो कक्ष** **दिनांक: २६ नोव्हेंबर, २०२५**

**प्रति,**

**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,**

रासेयो संलग्नित, सर्व विद्यापीठे/संचालनालये

**विषय:-** **<u>सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामधील विशेष निवासी शिबिराचे आयोजना बाबत..</u>**

**संदर्भ:-** या कार्यासना समक्रमाकांचे दिनांक ६ नोव्हेंबर, २०२५ चे पत्र कृ. पहावे

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विद्यापीठ संलग्नित सर्व रासेयो महाविद्यालयामध्ये वर्षातून एकदा विशेष निवासी शिबिराचे आयोजन दत्तक घेतलेल्या गावी माहे नोव्हेंबर ते जानेवारी या हिवाळा ऋतुमध्ये आयोजित करण्यात येते. तसेच राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना २ वर्षामध्ये प्रतिवर्षी १२० म्हणजे एकूण २४० तास व दोन्ही वर्षात मिळून एकदा विशेष निवासी शिबिर करणे अनिवार्य आहे.

१. सन २०२५-२६ मधील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत वार्षिक विशेष निवासी शिबिरांचे आयोजन दि.०१/११/२०२५ ते दि.३१/०१/२०२६ या कालावधीत आयोजित करणेबावत उक्त संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात आलेले आहे.

२. रासेयो कार्यक्रम समन्वयक तथा संचालक यांनी विद्यापीठ/संचालनालय संलग्नित सर्व रासेयो महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या गावामध्ये सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विशेष निवासी शिबिरांचे आयोजन दि.०५/११/२०२५ ते दि.३१/०१/२०२६ या कालावधीत करीत असताना सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरीता रासेयो कार्यक्रमासाठी केंद्र शासनाकडून निर्गमित करण्यात आलेली थीम ***"Youth for sustainable development with special focus on watershed management and wasteland development"*** ची अमंलबजावणी करावी. विशेष निवासी शिबीराचे आयोजन करताना खालील उपक्रमांचा प्राथम्याने समावेश करण्यात यावा.

१.शिबिरातील सहभागी युवकांची तसेच गावातील किशोरवयीन मुला-मुलींचे आरोग्य शिबिर आयोजित करुन अनेमिया (रक्तक्षय) तपासणी, रक्त गटतपासणी यासारखे उपक्रम राबवावेत.

२.सकस आहार आणि असंसर्गजन्य रोगांबाबत जनजागृती करणे.

३.गावस्तरावर शोषखड्डे /पाझरखड्डे तयार करणे. स्वच्छ भारत अभियान-२ अंतर्गत गावामध्ये मंजूर शोष खड्डे पुर्ण करुन घेण्यासाठी पाठपुरावा करणे.

४. “पाणी आडवा-पाणी जिरवा” या योजनतर्गत दत्तक गावात गावक-यांच्या सहकार्याने बंधारा बांधून त्या बंधा-यामध्ये किती घनमीटर (Cubic meter) पाणी साठविण्याची क्षमता आहे याबाबतची नोंद घ्यावी.

५.बालविवाह रोखण्यासाठी समाज प्रबोधन करणे.

५. रस्ते सुरक्ष बाबत जनजागृती करणे.

६. सायबर सुरक्षा बाबत जनजागृती करणे.

७. महिला सक्षिमीकरणाबाबत जन जागृती करणे.

८.संपुर्ण आरोग्यासाठी “मानसिक आरोग्य”का महत्वाचे आहे या विषयावर व्याखाने आयोजित करण्यात यावीत.

तसेच विहित मुदतीत विशेष शिबिर आयोजित करण्यास्तव रासेयो कार्यक्रम समन्वयक तथा संचालक यांनी सर्व कार्यक्रम अधिकारी यांना सूचित करावे. तसेच विशेष शिबिर संपन्न झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल विहित विवरण पत्रात रासेयो क्षेत्रिय संचालनालय, पुणे व रासेयो राज्य संपर्क अधिकारी, महाराष्ट्र शासन, यांना तात्काळ पाठविण्यात यावा.

**सोबत- विवरण पत्र**



**(डॉ.मिलिंद काळे)**
राज्य संपर्क अधिकारी, विशेष कार्य अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

प्रत- माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित

१. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक
२. रासेयो क्षेत्रिय संचालक, रासेयो क्षेत्रिय संचालनालय, पुणे